# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५३८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२५/०८/२०१६

**१) विवाहीतेस शारीरीक व मानसीक छळ केल्याने गुन्हा नोंद . :—**

नोव्हेबर २०१५ ते २४/०८/२०१६ पर्यन्त यातील फिर्यादीस आरोपीतांनी संगनमत करुन शारीरीक व मानसीक त्रास दिल्याने व महीला समुपदेशक केन्द्र भंडारा यांचे पत्रावरुन व फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४९८(अ),३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. शेंडे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) बुट हाऊसचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २४/०८/०१६ रोजी १६.०० वा. दर. यातील फिर्यादी सुभाष नरेश मेश्राम वय २४ वर्ष, रा. सेंदुरवाफा साकोली याची सुभाष बुट हाऊस दुकानाचे बाजुस आरोपीचे टौवाडे चायनीज दुकान असुन आरोपीने फिर्यादीचे दुकानाचे मागील बाजुस कचरा जाळल्याने आग पसरत फिर्यादीचे दुकानाचे कवटी वरुन जावुन दुकानाला आग लागुन सुभाष बुट हाऊस जळुन अंदाजे ३५,००००/—रु. चे नुकसान झाल्याने असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४३५ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २३/०८/०१६ रोजी १९.३० वा. दर. यातील फिर्यादीचे पती हे माज घरात पलंगावर झोपुन टिव्ही पाहत असतांना यातील आरोपी हा 'घरात प्रवेश करुन तुम्ही माझी सोडचिठ्ठी करुन दया' नाहीतर तुम्हाला मारतो असे फिर्यादीचे पतीला बोलुन शिविगाळ केले व त्याचे दोन्ही पाय ओढुन गालावर थापडाने मारहान करुन जिवाने मारण्याची धमकी दिली असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४५२,३२३,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक २४/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहनांकरीता ०४ तिन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व इतर वाहनांवरती ११५ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(श्री.एस. टी. घुसर )
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र.८८०५६१९१९१

२५/८/१६

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.